महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

बुधवार ■ 29 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 214 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# दोषी आढळल्यास मुंडेंवर कारवाई !

## अजित दादांची स्पष्टोक्ती



**अजित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत काय चर्चा झाली? याविषयीची माहिती अजित पवार यांनी सागितली. तसेच सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, असंही अजित पवार यांनी स्पष्ट केलं. तसेच भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुडेंच्या राजीनाम्यासंदर्भात देवेंद्र फडणवीस नाही तर अजित पवार निर्णय घेतील असं म्हटलं होतं. यावरुन अजित पवार यांनी प्रत्युत्तर देत सुरेश धस यांना काय वाटतं त्याच्याशी मला काही घेणं देणं नाही, असं म्हणत खोचक टीका केली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. 28 :केवळ संशयाच्या आधारे आणि इतरांनी केलेल्या आरोपांच्या आधारे कोणाचाही राजीनामा घेणे योग्य नाही, बीड प्रकरणात ज्या चौकशा सुरू आहेत त्या पूर्ण झाल्यानंतरच, त्यात जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे मत आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केले आहे. यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची शक्यता त्यांनी जवळपास फेटाळली आहे. बीड मधील सरपंच हत्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहभाग अप्रत्यक्षरीत्या आहे असा आरोप होत असतानाच त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांसह भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी वारंवार केली आहे. यासोबतच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आधी मुख्यमंत्री आणि त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांच्यातील संबंधांबाबत काही कागदपत्रे सादर केली आहेत. त्यात या हत्या प्रकरणाशी मुंडे यांचा थेट संबंध असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरती आज उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली आणि त्यांच्यात यावर चर्चा देखील झाली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना या भेटीतील तपशील अजित पवार यांनी जाहीर केला. या प्रकरणी सुरू असलेल्या तिन्ही प्रकारच्या चौकशांमध्ये जे सत्य समोर येईल त्यानुसारच कारवाई केली जाईल असेही पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. सुरेश धस काय बोलतात याला आपण फारसे महत्त्व देत नाही, आपली चर्चा ही थेट भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी असते त्यामुळे याप्रकरणी आम्हाला जो योग्य वाटेल तो निर्णय घेतला जाईल असेही पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.



# शंभर दिवसांच्या नियोजनाचा मुख्यमंत्र्यांकडून आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे पुढील १०० दिवसांच्या नियोजनाच्या अनुषंगाने मत्स्यव्यवसाय, जलसंपदा, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन, क्रीडा व युवक कल्याण आणि मदत व पुनर्वसन आणि दिव्यांग कल्याण विभागांचा आढावा घेतला. यामध्ये गोड्या पाण्यातील मासेमारी वाढीसाठी मत्स्यबीज धोरण तयार करणे, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे, दूध भेसळ रोखण्यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी, दिव्यांगांच्या कल्याणासाठी कॉर्पोरेट सहकार्याने धोरण आखणे, प्रत्येक जिल्ह्यात पाळीव प्राण्यांसाठी रुग्णालय उभारणे आणि राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी रिअल टाईम मॉनिटरिंग यंत्रणा उभारण्यावर भर देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून पीक नुकसान मदतीचे प्रभावी वाटप करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले आहेत. यासह विविध विभागांना दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे –

### मत्स्य व्यवसाय विभाग –

राज्यात मत्स्य बीज प्रक्रियेविषयी उल्लेखनीय कार्य सुरू आहे. त्यांस अधिक प्रोत्साहन आणि आर्थिक सहाय्य देण्यात यावे

सागरी मासेमारी विषयी सर्वसमावेशक धोरण तयार करावे.

केंद्र शासनाने मत्स्य व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा दिला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील मत्स्य व्यावसायिकांना लाभ मिळण्यासाठी कार्यवाही करावी.

धरण क्षेत्रातील मासेमारी व्यवसायासाठी ही सर्वसमावेशक धोरण तयार आणि मासेमारी संस्थांचा कारभार पारदर्शक राहील याची दक्षता घ्यावी

### क्रीडा व युवक कल्याण विभाग

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी खेळाडूंसोबत जाणाऱ्या मार्गदर्शक व फिजिओथेरपिस्ट यांच्या खर्चाची जबाबदारी क्रीडा विभागाने घ्यावी यासाठी नियोजन करावे.

आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंना आवश्यक असलेल्या व्हिसा प्रक्रियेच्या त्वरीत पूर्ततेसाठी क्रीडा विभागाने समन्वय साधावा.

राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर अधिक संधी मिळण्यासाठी शालेय स्तरावर क्रीडा कौशल्य विकसित करावे; यासाठी जिल्हास्तरीय स्पर्धांची संख्या वाढवावी.

### दुग्धव्यवसाय विकास विभाग

– राज्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीवर प्रतिबंध घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दुग्धव्यवसाय विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने धडक मोहिमा राबविण्यात याव्यात.

सी.एस.आर.च्या माध्यमातून दूध उत्पादकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

राष्ट्रीय डेअरी विकास मंडळ राज्यात उल्लेखनीय कार्य करीत आहे; त्याच्या माध्यमातून राज्यातील दुधाची उपलब्धता वाढवण्यावर भर द्यावा.

विदर्भातील दूध उत्पादनात वाढ झाली असून, त्यामध्ये आणखी वृद्धी साधण्यासाठी कार्यवाही करावी.

### दिव्यांग कल्याण विभाग –

दिव्यांग विभागाअंतर्गत अनुदानित विशेष शाळा व कार्यशाळांमध्ये आधार कार्ड नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी.

विद्यार्थ्यांची व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदवण्यासाठी आधार संलग्न बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सुरू करावी.

दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (UDID कार्ड) अत्यावश्यक आहे; त्यासाठी राज्यभरात विशेष मोहिमेचे आयोजन करावे.

नमो दिव्यांग शक्ती अभियान योजनेअंतर्गत, उर्वरित जिल्ह्यांमध्ये दिव्यांग पुनर्वसन केंद्र तातडीने सुरू करावेत.

शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजना आणि दिव्यांग व्यक्ती विवाह योजना DBT प्रणालीद्वारे प्रभावीपणे राबविण्यात याव्यात.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : लोकसभा विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील जनतेचे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे. गेल्या ४ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे निवडणूका लांबणीवर पडल्याचे चित्र आहे. यातच आज पुन्हा २३ व्या नंबरवर सर्वोच्च न्यायालयात निवडणूका आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. परंतु आज पुन्हा न्यायालयाकडून सुनावणीसाठी पुढची तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडणार असल्याची चिन्हं आहेत. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी पुढील सुनावणीसाठी २५ फेब्रुवारीची तारीख दिली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर प्रत्येक पक्षाला आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. यासाठी राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणी देखील सुरु झाली आहे. पण राजकीय धुरीणांसह जनतेला निवडणुकीची पुढील काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून न्यायालयात निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती करण्यात आली. ओबीसी आरक्षण असो किंवा नसो पण निवडणुका व्हाव्यात, अशी याचिकाकर्त्यांनी मागणी केली आहे.

दरम्यान मुख्यमंत्यांनी अलीकडेच पार पडलेल्या भाजपच्या राज्यस्तरीय अधिवेशनात लवकरच राज्यात निवडणूका लागणार असल्याचे संकेत दिले होते. तर निवडणुका लवकरात लवकर लागाव्यात यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले होते. पण आज झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाच्या पदरी पुन्हा निराशा पडली आहे. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारीला होणार असून यावेळी काय निर्णय़ होणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# बेकायदा बॅनरच्या तक्रारी करा

## अंबरनाथ नगरपरिषदेचे नागरिकांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : गेल्या काही काळात शहरात बॅनरबाजीचे प्रकार वाढले असून त्यामुळे शहर विद्रुपीकरणही होते आहे. राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी यात आघाडीवर आहेत. कोणत्याही परवानगीशिवाय लावण्या जाणाऱ्या या बॅनरवर कारवाई करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मात्र यात ठोस कारवाई होताना दिसत नाही. तरीही पालिका प्रशासनाने आता नागरिकांना या बेकायदा बॅनरची तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाने दोन दूरध्वनी क्रमांकही जाहीर केले आहेत. त्याला कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. याकरिता अंबरनाथ नगरपालिकेने ०२५१-२६८२३५३ / ७७९८११४१२३ हे दोन दूरध्वनी क्रमांक जाहीर केले आहेत. या क्रमांकावर बेकायदा जाहिराचे छायाचित्र काढून पत्त्यासोबत पाठवता येणार आहे.

# कल्याणमधील विस्तारित खडकपाडा मेट्रोची निविदा लवकरच

## – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली शहरे विविध विकास कामांमुळे झपाट्याने विकसित होत आहेत. या विकसित मार्गातील आणखी एक महत्वाचा टप्पा म्हणजे कल्याणमधील मेट्रो ५ मार्ग. कल्याण शहरातील खडकपाडा, बिर्ला महाविद्यालय या विस्तारित मेट्रो मार्गाची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी रात्री येथे दिली.

एमसीएचआय कल्याण शाखेतर्फे गृहोत्सव प्रदर्शनाचे फडके मैदान येथे आयोजन केले होते. या प्रदर्शनाचा समारोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी व्यासपीठावर आमदार विश्वनाथ भोईर, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, एमसीएचआय कल्याण शाखेचे अध्यक्ष राजेश गुप्ता, सचिव सुनील चव्हाण, माजी अध्यक्ष रवी पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे उपस्थित होते.



**कल्याण, डोंबिवली शहरांमधील पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. कल्याण शहरातील मेट्रो मार्गाच्या विस्तारित कामाची निवीदा प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. विकासाची ही सकारात्मक पावले या शहराचा चेहरा बदलणार आहेत -एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री.**

ठाणे-भिवंडी-कल्याण ते तळोजा हा ठाणे जिल्ह्यातील महत्वाचा टप्पा मेट्रो मार्गाने जोडला जाणार आहे. यामुळे गर्दीचे विभाजन होऊन नागरिकांना सुखकर प्रवास करणे शक्य होणार आहे. कल्याणमधील नागरिकांच्या मागणीचा विचार करून, आणि शिवसेनेचे शहरप्रमुख रवी पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे कल्याणमधील मेट्रो मार्ग खडकपाडा, बिर्ला महाविद्यालय पर्यंत विस्तारित करण्यात आला आहे. कल्याण शहराच्या विस्तारित मेट्रो मार्गाचा शहाड परिसरातील नागरिकांना लाभ होणार आहे. कल्याणमधील विस्तारित खडकपाडा मेट्रो मार्गाची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू केली जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

कल्याण डोंबिवली शहराची लोकसंख्या वाढत आहे. वाढत्या नागरीकरणासाठी भविष्यातील या शहरांच्या पाणी प्रश्नाचा विचार करून काळू धरणाचा विचार करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यातील अनेक शहरांची तहान काळू धरण भागविणार आहे. काळू धरणाचे काम लवकर पूर्ण व्हावे. यासाठी शासन प्रयत्नशील आहे. काळू धरणामध्ये वन विभागाची जमीन बाधित होत आहे. या जमिनीच्या बदल्यात ३५० कोटी रूपये वन विभागाला भरणा करण्यात आले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.नवी मुंबईला मोरबे धरणाचा पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर नवी मुंबईच्या वाट्याचे १४० दशलक्ष लीटर पाणी कल्याण, डोंबिवली शहरांना देण्याचा विषय अनेक वर्ष प्रलंबित आहे. हा विषयही लवकर मार्गी लागेल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# अमृत महोत्सव सोहळा

# देवतुल्य माणूस अप्पा शिंदे

## संपादकीय

मानवी जीवनाला चांगल्या कर्तृत्वाची जोड मिळाली की, अशी माणसं आपसूक जण सामान्यांच्या गळ्यातील ताईत बनतात. कल्याण शहरातील अप्पा अर्थात जगन्नाथ शिंदे असेच एक वेक्तिमत्व देशाच्या स्वातंत्र्य प्राप्ती नंतर म्हणजे 29 जानेवारी 1950 मध्ये त्यांचा जन्म कल्याण पूर्वेतील वालधूनी येथे झाला. वडिलांचा कोळसाचा व्यवसाय त्यामुळे घरात याच कामा धंद्याची चर्चा. याच स्थितीत त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण काटेमानिवली येथील शाळेत पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण याच शहरात पूर्ण केले, महावीध्यालयीन शिक्षण रूपारेल कॉलेज मुबंई मध्ये पूर्ण केले. वडिलांच्या व्यवसायात रस नसल्यामुळे त्यांनी एका खाजगी इंजिनिअर कंपनी मध्ये काम केले.मात्र आपला जन्मच सामाजिक बांधिलकीसाठी झाला आहे. ही विचारधारा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे कंपनी मधून स्वेछा निवृत्ती घेऊन स्वतः प्रवीण इंजिनेरिंग नावाची कंपनीची स्थापना केली.

तिचा कारभार वाढत असतानाच त्यांनी केमिस्ट व्यवसायात स्वतःला झोकून दिले. या व्यवसायातील शासकीय अधिकाऱ्यांचा तगादा , तसेच आरोग्यभिमुख सुविधा असताना अनेक जाचक नियम आणि अटी शर्थी यामुळे केमिस्ट व्यवसायधारक त्रस्त होते. त्यांना एकत्र करत त्यांची एकजूट करत अप्पा शिंदे यांनी त्यांची संघटना तयार केली या संघटनेच्या माध्यमातून केमिस्ट व्यवसायधारकांना न्याय मिळवून दिलाच तसाच रुग्णांना देखील त्याचा फायदा झाला. यामुळे अप्पा शिंदे यांचे संघटन नेतृत्व प्रसिद्धीस आले. त्यानंतर त्यांनी विविध सामाजिक संघटनेच्या. माध्यमातून शहरातील गरीब गरजूना मदत देण्यासाठी पुढाकार घेतला.



**✍ रविंद्र घोडविंदे**

आठवड्यातील प्रत्येक गुरवारी तें गोर गरबीना मदतीसाठी भेटू लागले, त्यातून त्यांची एक दानशूर वेक्ती म्हणून ओळख झाली. त्याच दरम्यान त्यांनी शिक्षण, क्रीडा, व आरोग्य सामाजिक सेवेसाठी स्वतःला झोकुण देत सेवा कार्यसुरु केले. कोव्हीड च्या काळात तर त्यांनी औषधें व रिमडीसिव्हर इंजेक्शन उपलब्ध करून देत अनेकांचे प्राण वाचवले या काळात अनेकांना देवदूतासारखी त्यांची मदत झाली. त्यांच्या सामाजिक शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील कामाची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आध्यक्ष शरद पवार यांनी त्यांना विधानपरिषदेत सदस्य म्हणून संधी दिली या काळात त्यांनी कल्याण डोंबिवली शहर हे विकासाचे केंद्र मानून या शहरांच्या विकासासाठी नवनवीन प्रकल्प आणले.व विधानपरिषदेच्या माध्यमातून राज्यातील नावीन्यपूर्ण प्रकल्प उभारणीस पाठबल दिले. बहुआयामी वेक्तिमत्व म्हणून त्यांची छाप ओळख, राज्याच्या राजकीय, सामाजिक पटलावर निर्माण झाली.

हसरे वेक्तिमत्व, मितभाषी मात्र तितकेच अभ्यासू संयमी शांत स्वभाव-वृतीचे अप्पा शिंदे म्हणजे एक आपला हक्काचा माणूस ही त्यांच्या विषयीची सामान्य जनतेतील भावना आज ही कायम आहे. हे त्याचेच धोतक आहे. केमिस्ट असोसियेशनचे आध्यक्ष असले तरी गोर गरिबांचे ते आधारवड होते; आहेत ! त्यांनी अनेक उच्च पदे भूषवली मात्र जमिनीवरचे त्यांचे चालणे याच अप्रूप आजही साऱ्याना भुरळ घालणारे ठरते आहे. आज अप्पा आपल्या जीवनातील अमृतमहोत्सव साजरा करत आहेत. त्यांनी सामान्य माणसासाठी केलेले असामान्य काम ही त्यांच्या जीवनातील खरी शिदोरी आहे. माणूस किती जगला, यापेक्षा त्याच जगणं जन हितासाठी किती सार्थकी लागलं यातच जीवन जगण्याच सार मर्म समाविष्ट असते. अप्पा शिंदे यांच्या जगण्यात सामाजिक बांधिलकी, गोर गरिबांच्या कल्याणाची ओढ, आणि प्रेम भावना बघितली तर त्याच्या जीवनातील अमृत महोत्सवाच्या जीवन प्रवाहाची निरोगी आयष्यमय शताब्दी साजरी व्हावी हीच परमेश्वरास विनम्र प्रार्थना. अप्पा ना अमृत महोत्सवी प्रकट दिनाच्या दै. ठाणे जीवनदीप वार्ता कडून मनःपूर्वक शुभेच्छा



भारतीय औषध व्यापार क्षेत्रात कार्यरत राहून, गेल्या अनेक वर्षांत देशभरातील 10,00,000 पेक्षा अधिक किरकोळ औषध विक्रेते व घाऊक यांच्या व्यापाराशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यात व औषध उत्पादक व व्यापार यांच्यातील व्यापार व्यवहार निश्चित करण्यात अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या माध्यमातून विशेष योगदान दिले आहे. व्यापाराशी संबंधित वाद कमी करणे व परस्पर फायद्यासाठी व्यापारी प्रथांचा कार्यक्षमतेने अंमलबजावणी करणे हा त्यांचा विशेष रस आहे. रिटेलर्सना सतत प्रशिक्षण, रोग व्यवस्थापन, ग्राहक सल्ला सेवा, व्यक्तिमत्त्व विकास, व कार्यशील भांडवल व्यवस्थापन यामध्ये सुधारणा करून ग्राहकांना दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सध्याच्या पारंपरिक दुकानदारांना आधुनिक तंत्रज्ञान व च्या मदतीने सुसज्ज किरकोळ चेनमध्ये रूपांतरित करण्याचे त्यांचे महत्त्वाकांक्षी ध्येय आहे, ज्यामुळे ग्राहकांपर्यंत गुणवत्तापूर्ण उत्पादने पोहोचतील. आसा आप्पांचा प्रयत्न आहे.

**दर गुरुवारी गरजुंना मदत**

कल्याण कोळसेवाडी येथे दर गुरुवारी सर्वसामान्य नागरीकांसाठी मदतीकरता दरबार भरतो. राज्यभरातून आलेल्या शेकडो गरजुंना यावेळी मदत केली जाते. गेल्या 10 वर्षापासून अखंडीत पणे सामाजिक बांधिलकी जोपासून मदत केली जात आहे.

**विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत**

विद्यार्थ्यांना फी, प्रवेश, उच्च शिक्षण या करता आर्थिक योगदान शाळा, क्लास, महाविद्यालय यांच्या नावाने निधीचे वितरण - गत पाच वर्षात 10 हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

**देशाच्या काना कोप-यात आरोग्य सेवा**

औषधोपचाराकरता देशभरातील गरजवंतांना विनामुल्य औषधी उपलब्ध करुन दिली जातात. डायलेसीस, कॅन्सर, दमा या सारख्या रुग्णांकरिता विविध हॉस्पिटलच्या माध्यमातून विनामुल्य उपचार. गत पाच वर्षात काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंत हजारो गरजुंना औषधी आणि रुग्णालयाच्या खर्चासाठी मदत उपलब्ध करुन दिली.

**राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन**

मुलांमध्ये खेळभावना जागृत रहावी या हेतूने विविध खेळांमध्ये पारंगत असलेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाकरता अनुदान उपलब्ध करुन दिले. खो-खो, कबड्डी, आट्या पाट्या, लंगडी, बॅटमिंटन, बेस बॉल यासारख्या खेळांमध्ये पारंगत खेळाडूंना मदत उपलब्ध करुन दिली.

## केमिस्ट स्वाभिमान दिवस

देशाच्या कानाकोप-यात दरवर्षी 29 जानेवारी हा केमिस्ट स्वाभिमान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. सामाजिक योजनांचा सप्ताह साजरा केला जातो. देशात ठिकठिकाणी ब्लड कॅम्प, गरजुंना अन्नदान, धान्य वाटप, नेत्रदान देहदान संकल्प, आरोग्य तपासणीचा महामेळावा घेण्यात येतात. लाखो नागरीकांना दरवर्षी लाभ मिळतो.

## जागतिक फार्मासिस्ट दिवस

जागतिक फार्मासिस्ट दिवस देशभरातील केमिस्ट एकाच दिवशी एकाच वेळेला फार्मासिस्ट दिना निमित्त सामाजिक उपक्रम राबवितात. नागरीकांना आरोग्याचे संदेश देत रैली काढून चौकात फार्मासिस्ट शपथ ग्रहण करतात. देशातील फार्मासिस्टचा स्तर जागतिक पातळीवर उंचाविण्याचे कार्य केले गेले. नेत्रदान देहदान संकल्प, आरोग्य तपासणीचा महामेळावा घेण्यात येतात. लाखो नागरीकांना दरवर्षी लाभ मिळतो.

## निरंतर प्रशिक्षण कार्यशाळा

देशभरातील केमिस्ट करता निरंतर प्रशिक्षण कार्यशाळा सातत्याने घेण्यात येते. केमिस्ट बरोबर नागरीकांचाही काही वेळेस समावेश करुन आरोग्य जनजागृती करण्यात येते. रुग्ण आणि केमिस्ट ची आपुलकीची नाळ जोडण्याचे कार्य संघटनेच्या माध्यमातून केले गेले.

## महिला केमिस्टला प्रोत्साहन

देशाच्या कानाकोप-यात फार्मासिस्ट महिलांसाठी केमिस्ट विंग तयार करण्यात येत असून त्यांना अधिक सक्षम करुन त्यांचे व्यावसायिक कौशल्य वृद्धीगत करण्यासाठी महिला मार्गदर्शन मेळावे आयोजित करण्यात आले. त्यांचे समाजातील सामाजिक योगदान वाढविण्यासाठी प्रोत्साहन आणि सहकार्य करण्यात आले.औषध विक्रेत्यामध्ये आधुनिकतेची कास निर्माण व्हावी या हेतूने प्रत्येकाला संगणकीकृत करण्याचे शिवधनुष्य उचलण्यात आले. केमिस्ट ने सक्षम होण्यासाठी वेळप्रसंगी त्याला आर्थिक सहयोग देवून संगणकाकडे वळविण्यात आले. आज एका क्लीकवर केमिस्ट रुग्णांची माहिती त्यांच्याकडे संकलीत करीत आहे.

## केमिस्टला आधुनिकतेची जोड

औषध विक्रेत्यामध्ये आधुनिकतेची कास निर्माण व्हावी या हेतूने प्रत्येकाला संगणकीकृत करण्याचे शिवधनुष्य उचलण्यात आले. केमिस्ट ने सक्षम होण्यासाठी वेळप्रसंगी त्याला आर्थिक सहयोग देवून संगणकाकडे वळविण्यात आले. आज एका क्लीकवर केमिस्ट रुग्णांची माहिती त्यांच्याकडे संकलीत करीत आहे.

## केमिस्टला आधुनिकतेची जोड

औषध विक्रेत्यामध्ये आधुनिकतेची कास निर्माण व्हावी या हेतूने प्रत्येकाला संगणकीकृत करण्याचे शिवधनुष्य उचलण्यात आले. केमिस्ट ने सक्षम होण्यासाठी वेळप्रसंगी त्याला आर्थिक सहयोग देवून संगणकाकडे वळविण्यात आले. आज एका क्लीकवर केमिस्ट रुग्णांची माहिती त्यांच्याकडे संकलीत करीत आहे.

## आबांचे ते शब्द....

**देशातील केमिस्ट चे दिशादायी नेतृत्व**



आप्पांनी प्रशिक्षणांसाठी शाळा काढली तर राज्यभरातील नेते त्यांच्याकडे प्रशिक्षणासाठी येतील. एखादी संस्था लहान असते ती मोठी होत जाते आणि नंतर नेतृत्वासाठी चढाओढ लागते. परंतू देशातील एकमेव संघटना की 8.50 औषध विक्रेते एकाच नेतृत्वाखाली कार्य करते. संघटनेने एकछत्री नेतृत्वात दैदिप्यमान असे कार्य उभे केले आहे. संगळ्यांना समान न्याय देत एकत्र ठेवून संघटनेची भरभराट कशी करावी हे अप्पासाहेब जगन्नाथ शिंदे यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. एकतेचे बळ सिद्ध होते. **कै. आर. आर. आबा पाटील , तत्कालीन गृहराज्य मंत्री**

## केमिस्ट हृदयसम्राट



केमिस्ट हृदयसम्राट, सेवापुरूष अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेचे अध्यक्ष, माजी विधान परिषद आमदार जगन्नाथ(आप्पा) शिंदे यांचा ७५ वा अमृतमहोत्सवी वाढदिवस संपूर्ण देशभर मोठया प्रमाणात साजरा होत आहे. त्यानिमित्त संपूर्ण देशभरात २४ जानेवारी रोजी झालेल्या रक्तदान संकलन आणि प्रतिज्ञा सोहळ्यात तब्बल ७५ हजारांपेक्षा अधिक रक्तदात्यांनी सक्रीय सहभाग नोंदवून आप्पांना ७५ व्या वाढदिवसाची गोड भेट दिली.

तर आप्पांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनकडून महालक्ष्मी लॉन्स कोथरूड पुणे येथे 75 जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्याला उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या प्रमूख उपस्थितीत 5 हजार जनसमुदायाच्या साक्षीने 75 जोडप्यांचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी प्रत्येक जोडप्याला एक ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र सोन्याची नथ चांदीची जोडवी संसार उपयोगी लागणारी सर्व भांडी वधू-वरांना तीन-तीन पोशाख देण्यात आले.

तर कल्याण शहरात आज सर्व सामाजिक संस्थांच्या वतीने आप्पांचा जीवनपट उलगडवणारी प्रकट मुलाखत सप्तकन्या मंगल कार्यालय कल्याण पूर्व येथे होणार आहे. या प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत.


तर 29 जानेवारी 2025 रोजी सायंकाळी 5 वाजता पोटे मैदान जिम्मीबाग कल्याण पूर्व येथे आप्पांचा अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा, जगन्नाथ आप्पा शिंदे अमृत पर्व नागरी सत्कार सोहळा नियोजन समितीकडून आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादीचे काँग्रेसचे प्रमूख नेते शरदचंद्र पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुनील तटकरे, भाजप कार्यकारी अध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण, मंत्री हसन मुश्रीफ, दादा भुसे, प्रकाश आंबेडकर, खासदार बाळया मामा म्हात्रे तसेच समितीचे अध्यक्ष खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, स्वागत अध्यक्ष आमदार सुलभाताई गायकवाड यांच्यासह ठाणे जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार खासदार आणि लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

केमिस्ट संघटनेच्या कार्यप्रवाहात एका तेजस्वी ता-याचा उदय झाला संघटनेच्या समोर असलेल्या बिकट समस्या आणि खडतर संघर्षाचा पावित्रा घेवून युद्धाचे रणशिंग फुंकणारे नेतृत्व आप्पासाहेब शिंदे औषध विक्री संघटनेचे महानायक ठरले आहे.

एक संघटना शिस्त नियोजनावर भर देते त्यातुन काय होवू शकते हे समाजातील प्रत्येक घटकाला दाखवून दिले. फक्त संघटनात्मक विकास साधून त्यालाच यश न मानता समाजाचेही आपण देणे लागतो या विषयाला देखील त्यांनी महत्व दिले. औषध विक्रेत्यांना सातत्याने सामाजिक कार्यात सहभागी करुन घेणारे दिशादायी नेतृत्व समाजाला लाभले. औषध विक्रेत्यांचे विशिष्ट ओळख समाजासमोर करुन दिली.

**- देवेंद्रजी फडणविस, मुख्यमंत्री, म.राज्य**





# कल्याण पडघा मार्गावरील गांधारी नदीवर समांतर पुल बांधा

## मा.आ.नरेंद्र पवारांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर :कल्याण - पडघा मार्गावरील गांधारी नदीवर अस्तित्वात असलेल्या पुलाला समांतर नविन उड्डाणपुल बांधण्याची मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीसंदर्भात पवार यांनी आज मुख्यमंत्र्यांची भेट घेत आपल्या मागणीचे निवेदन सादर केले. कल्याण शहरातून पडघामार्गे नाशिकला जाण्यासाठी सध्या गांधारी नदीवरील उड्डाणपूल हा एकमेव पर्याय आहे. मात्र हा उड्डाणपुल बांधून जवळपास 30 वर्षांहून अधिक काळ झाला



आहे. सद्यस्थिती पाहता हा पूल अतिशय अरुंद असून या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या गेल्या तीन दशकांत प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यासोबतच राज्याच्या दृष्टीने गेमचेंजर प्रकल्प असणाऱ्या मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गाला जोडणारा इंटरचेंजही याच मार्गावरील आमणे गावात बांधण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण पडघा मार्गावरील वाहतूकीत येत्या काळात आणखी मोठी भर पडणार असून अस्तित्वात असलेला गांधारी उड्डाणपूल त्यासाठी निश्चितच अपुरा पडेल अशी वस्तुस्थिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी आपल्या निवेदनाव्दारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडली आहे.

त्याशिवाय काही वर्षांपूर्वी आलेल्या महापुराच्या पाण्यामुळे या गांधारी पुलाला तडेही गेले होते. हा उड्डाणपूल केवळ कल्याण -पडघामार्गे नाशिक, आग्र्याला जाणारा दुवाच नाहीये, तर या मार्गावर बापगाव, सोनाळे, सावद, लोणार या गावांतील हजारो रहिवाशांना कल्याणला जोडणारा महत्त्वाचा धागाही आहे. तसेच गेल्या काही वर्षांमध्ये या भागात मोठ्या संख्येने गोडाऊनही झाली असून त्यामध्ये काम करणारे हजारो कर्मचारीही दररोज याच मार्गावरून ये जा करत असतात.

त्यातच समृद्धी महामार्गाचा इंटरचेंज सुरू झाल्यानंतर या मार्गावरून जाणाऱ्या वाहनांची वाढीव संख्या आणि अस्तित्वात असलेल्या वाहनांची संख्या ही या उड्डाणपुलाच्या क्षमतेबाहेर जातील. याचा विचार करता याठिकाणी तातडीने 6 किंवा 8 पदरी प्रशस्त असा नविन समांतर उड्डाणपूल बांधण्याची गरज असून या नविन समांतर पुलाला मंजुरी देऊन संबंधित विभागाला त्याचे आदेश देण्याची आग्रही मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# अटल सेतूचा पथकर कायम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई :अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर सध्या सुरू असलेल्या सवलतीच्या दरानेच आणखी एक वर्षभर पथकर आकारणी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता यापुर्वी ४ जानेवारी २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत एमएमआरडीएने प्रस्तावित केलेल्या दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने पथकर (कमीत कमी २५० रुपये इतका) आकारणीचा निर्णय घेण्यात आला होता. या दराचा एक वर्षानंतर आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आणखी एक वर्षभर म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सध्या सुरु असलेल्या सवलतीच्या दरानेच पथकर आकारणीस मान्यता देण्यात आली.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेला हा सुमारे २२ किलोमीटर लांबीचा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्प १३ जानेवारी २०२४ पासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

# भिवंडी, शहापूर तालुक्यातील जनजीवन पाणी योजना मार्गी लावा

## - मंत्री गुलाबराव पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी व शहापूर तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेअतंर्गत होत असलेल्या कामांमधील अडचणी तातडीने मार्गी लावाव्यात. यासाठी संबधित यंत्रणांनी त्यांच्याशी निगडीत असलेली कामे, परवानग्या विनाविलंब देण्याची कार्यवाही करावी. या कामास प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिल्या. मंत्रालयातील परिषद सभागृहात ठाणे जिल्ह्यातील भिवंडी व शहापूर तालुक्यातील जनजीवन मिशनअंतर्गत योजनांमधील विविध अडचणी संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी आमदार शांताराम मोरे, प्रधान सचिव संजीव खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहसचिव बी.जी पवार, मुख्य अभियंता प्रशांत भांबरे, अतिरिक्त अभियान संचालक सुषमा सातपुते, कोण गावचे सरपंच रेखा सदाशिव पाटील आणि उपसरपंच रेखा निलेश मुकादम यांच्यासह ठाणे जिल्ह्यातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भिवंडी व शहापूर तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे सुरू करण्यासाठी महसूल, जलसंपदा, वन विभाग, ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास विभागाकडून आवश्यक परवानगी मिळण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. जल जीवन मिशन योजनेची कामे जलद गतीने पूर्ण होऊन नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे म्हणून संबधित विभाग व यंत्रणांनी त्यांच्या विभागाच्या अखत्यारीत असलेले विषय, आवश्यक परवानगी तातडीने द्यावी, अशा सूचना पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील यांनी दिल्या.

यावेळी बैठकीत शहापूर तालुक्यातील 97 गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, कोनगाव, पडघा, आसनगाव, कळंभे, अंबाडी, कारीवली, बोरीवली तर्फ राहुर या पाणी पुरवठा योजनांच्या कामाचा आढावा घेण्यात आला.

## डोंबिवलीत

# मराठी-अमराठींमध्ये वाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : 'आपुल्याच घरात हाल सोसते मराठी', असं म्हटल्यास काही चुकीच ठरणार नाही. मुंबईला लागून असलेल्या शेजारच्या ठाणे जिल्ह्यात भाषिक वादासह मराठी विरुद्ध अमराठी अशा वादाच्या घटना वाढू लागल्या आहेत.

कालच कल्याणमध्ये एका मराठी तरुणाला परप्रांतीय रिक्षा चालकांनी मारहाण केल्याच प्रकरण समोर आलं होतं. या तरुणाने व्हिडिओ रेकॉर्ड करुन मनातील संताप बोलून दाखवला होता. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. आता कल्याण शेजारच्या डोंबिवलीमध्ये मराठी विरुद्ध अमराठी वाद समोर आला आहे. सत्यनारायण पूजा आणि हळदी कुंकू समारंभावरुन हा वाद झाला. पूजा आणि हळदी कुंकू समारंभाला सोसायटीतील अमराठी लोकांनी विरोध केला. पूजा आणि हळदी कुंकू समारंभासंदर्भात अपशब्द वापरल्याचा आरोप होत आहे. डोंबिवलीच्या या सोसायटीत पूजा आणि हळदी कुंकू समारंभावरुन शिवीगाळ केल्याचा आरोप होत आहे. मराठी-अमराठी आपापसात भिडले असून हे प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहचलं आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात या संदर्भात तक्रार नोंदवण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वी कल्याणमध्ये एका मराठी तरुणाने रेल्वे स्टेशन परिसराची दुरावस्था मांडली होती. यावेळी परप्रांतीय रिक्षा चालकांनी त्याच्यावर हात उचलला होता. एकपण लेडीज वरुन जायला मागत नाही "माणूस रोज थकून-भागून येतो. एकतरी सुविधा चांगली आहे का इथे? एरिया बघा, सगळे परप्रांतीय रिक्षा चालक भरले आहेत. वरती वेश्या व्यवसाय चालू आहे. एकपण लेडीज वरुन जायला मागत नाही, कारण तिथे वेश्या व्यवसाय चालतो. कोणी यावर बोलायला मागत नाही. इथून यायचं, तर रिक्षावाल्यांची गर्दी. आज माझ्यावर काठीने हात उचलला. मी विरोध करायला गेलो, तर 10 रिक्षावाले माझ्या अंगावर आले" अशा शब्दात या तरुणाने मनातील खदखद व्यक्त केली होती. 'तुम्ही मराठी लोक भिकारडे आहात' त्याआधी मागच्या महिन्यात डिसेंबरमध्येच कल्याणमध्येच एका उच्चभ्रू सोसायटीत मराठी कुटुंबाला मारहाण झाल्याची घटना घडली होती. एका अमराठी महिलेने तुम्ही मराठी लोक भिकारडे आहात. चिकन मटन खावून घाण करणारे आहात, असे संतापजनक शब्द वापरले होते.

# जीबीएस रुग्णांवरील उपचारासाठी विशेष व्यवस्था करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था निर्माण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या आजाराबाबत आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या आजाराबाबत सादरीकरण करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सध्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. मात्र रुग्णांना योग्य प्रकारे उपचार मिळावेत यासाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था करावी.या आजारावर केले जाणारे उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट आहेत. अजून काही प्रक्रिया करायची असल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करावी.

हा आजार दूषित पाण्यामुळे आणि न शिजवलेले अन्न, मांस खाल्यामुळे होतो. त्यामुळे अशाप्रकारचे अन्न टाळावे, पाणी उकळून पिण्याबाबत नागरिकांना आवाहन करावे. पुण्यात ३१ तारखेला क्रिकेट सामना आहे. त्यावेळी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्य विभागाला केली. पुणे शहरांतील रुग्णांवर उपचारासाठी पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात उपचार करण्याची सूचना करण्यात आली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.हा आजार दुर्मिळ आहे पण बहुतेक रुग्ण बरे होतात. हा आजार संसर्गजन्य नाही, प्रतिकारशक्ती कमी झाल्याने हा आजार होतो. याबाबत पुण्यात आढावा घेतला आहे. उपचार आणि तपासणी बाबतच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, दोन्ही महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने कार्यवाही सुरू आहे, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.पुण्यात सध्या 111 रुग्ण आहेत, 80 रुग्ण पाच किमीच्या परिघातील आहेत. 35,000 घरे आणि 94,000 नागरिकाच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. चाचणी घेण्यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी यांची मदत घेतली जाते आहे. एक मृत्यू झाला तो अद्याप GBS मुळेच झाला याची अजून पुष्टी नाही, असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

बुलडाणा जिल्ह्यातील केस गळती प्रकाराची समस्या नियंत्रणात आली आहे. यात आता नव्याने रुग्ण वाढ झालेली नाही. याबाबत 'आयसीएमआर' कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल, असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

# कल्याणमध्ये प्रेयसीच्या वादावरून तरुणाचं हादरवून टाकणारं कृत्य

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बिर्ला कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन तरुणांमध्ये एका तरुणीवरून वाद झाल्याची घटना घडली आहे. मात्र, हा वाद एवढा विकोपाला गेला की एका तरुणाने चक्क थार गाडी दुसऱ्या तरुणाच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला आहे. सुदैवाने यात कुठलीही मोठी दुर्घटना घडली नाही. मात्र, या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पुढील कारवाई सुरू केली आहे. सध्या पोलीस प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. पुढे आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, कल्याणच्या बिर्ला कॉलेजमध्ये हे दोन विद्यार्थी शिकत असून एका मुलीवर या दोघा मुलांचे प्रेम आहे. दरम्यान, 'माझी प्रेयसी तू पटवली,' असा वाद त्यांचा सुरू झाला आणि या वादातून सुयश जयेश तिवारी या तरुणाने श्लोक सागर सावंत या तरुणावर कल्याण लोकग्राम परिसरात थार ही कार अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. दरम्यान, घटनेतील सुयश जयेश तिवारी आणि श्लोक सागर सावंत हे दोघेही कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत. या घटनेबाबत कल्याण कोळशेवाडी पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून घटनेचा अधिक तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन्ही तक्रारदार तक्रार देत नसून जबाब नोंदवून घेतला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी दिली आहे. दुसऱ्या एका घटनेत, किरकोळ वादाच्या कारणावरून जावयाने सासऱ्यावर कुन्हाडीने घाव घालून हत्या केल्याची घटना यवतमाळच्या जवाहर नगर येथे घडली आहे. दिलीप पुरुषोत्तम वाडेकर (55) असे हत्या झालेल्या सासऱ्याचे नाव आहे, तर रचीद्र झिबलकर (29) असे मारेकरी जावयाचे नाव आहे. मारेकरी रचीद्र झिबलकर हा पत्नीसोबत वाद करत तिला नेहमी मारहाण करत होता. त्यामुळे मृतक दिलीप वाडेकर हे मुलीला घेण्यासाठी जवाहरनगर येथे आले होते. आरोपी रचीद्र झिबलकर याने मृतकासोबत वाद घालत कुन्हाडीचे घाव घालून सासऱ्याची हत्या केली. हा रक्तरंजित थरार यवतमाळच्या जवाहरनगर भारी परिसरात 27 जानेवारीच्या रात्रीच्या दरम्यान घडला आहे.

## एसटी भाडेवाढ विरोधात

# शिवसेना उबाठा गटाचे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एसटी ही सामान्य माणसाची जीवनवाहिनी आहे. ही भाडेवाढ म्हणजे सामान्य माणसांना कोलमडून टाकणारी असून आज गप्प बसलो, तर ही लूट थांबणार नाही असे सांगत कल्याणमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हा प्रमुख धनंजय बोडारे यांच्या नेतृत्वाखाली विठ्ठलवाडी बस डेपो येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

राज्यात एसटीच्या भाड्यात दरवाढ केल्याने याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत




असून या दरवाढीचा निषेध करण्यसाठी विठ्ठलवाडी बसडेपोच्या गेटवर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन करत चक्काजाम केला. बस डेपो मधून बाहेर पडणारी बस रोखून धरत सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कोळसवाडी पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत आंदोलकांना ताब्यात घेतले. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# राजूल पटेल उबाठा गटाच्या नेत्या शिंदे गटात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई महापालिकेतील उबाठा गटाच्या माजी नगरसेविका आणि महिला संघटक राजूल पटेल यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. याचबरोबर राज्यभरातील उबाठा गटाच्या शेकडो पदाधिकारी आणि हजारो कार्यकर्त्यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ठाण्यातील आनंदाश्रम येथे शिवसेना मुख्यनेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

मुंबई महापालिकेच्या माजी नगरसेविका आणि उबाठा गटाच्या महिला संघटक राजूल पटेल, विलेपार्लेचे शाखाप्रमुख सुनील भागडे, वरळीतील सुरेश कोठेकर आणि रोशन पावसकर यांच्यासह ४० पदाधिकारी आणि ५० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवाजी नगर, मानखुर्द येथील कार्यकर्ते तसेच उत्तर मध्य मुंबईमधील अशोक लोखंडे यांच्यासह २० पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. त्याचबरोबर मीरा भाईंदर महापालिकाचे माजी उपमहापौर प्रवीण पाटील, जयंती पाटील, अरविंद ठाकूर, शिवशंकर तिवारी यांच्यासह माजी नगरसेवकांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाने मुंबई आणि उपनगरात शिवसेनेचे पक्ष संघटन आणखी मजबूत झाली आहे.

कोल्हापूर जिल्हातील प्रदेश जनरल सेक्रेटरी सुजीत समुद्रे, प्रमोध धनावडे, शीतल कांबळे, उल्हास वाघमारे, किरण कांबळे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. सांगली जिल्ह्यातील प्रदेश जनरल सेक्रेटरी प्रशांत कांबळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते तसेच नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, मालेगाव शहापूरमधील २०० कार्यकर्ते, उबाठाचे माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी आज शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते पक्ष प्रवेश केला. याशिवाय नाशिक शिक्षक सेना, जळगाव शिक्षक सेनेतील शेकडो सदस्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला.

राजुल पटेल यांचा अल्प परिचय

राजुल पटेल या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या आहेत. त्या विधानसभेच्या महिला संघटक आणि माजी नगरसेविका आहेत. पक्षातील जुन्या महिला शिवसैनिक म्हणून राजुल पटेल यांची ओळख आहे. राजुल पटेल यांनी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांना तिकिट नाकारण्यात आले. यापूर्वी त्यांनी विधानसभा २०१९ ची विधानसभा निवडणूक लढवली होती.

## ठाणे जिल्हा परिषदेच्या

# कर्मचाऱ्यांच्या सुदृढ मानसिक आरोग्यासाठी MYCA ॲपचे उद्घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा परिषद, ठाणे आयोजित मानसिक आरोग्य विषयक जनजागृतीच्या उद्देशाने परिवर्तन व वोपा या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने 'मायका'हे मराठीमध्ये पहिले ॲप तयार करण्यात आले आहे. मानसिक आरोग्य या कोर्स चा लोकार्पण सोहळा आज, दि. २३ जानेवारी, २०२५ रोजी बैरामजी जीजीभाय हायस्कूलच्या सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, तर प्रमुख अतिथि म्हणून रेडिओ जॉकी (RJ) संग्राम खोपडे, परिवर्तन संस्थेचे डॉ. हमीद दाभोळकर, वोपा संस्थेचे संचालक प्रफुल्ल शशिकांत, संचालिका ऋतुजा जेवे हेही उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने कर्मचाऱ्यांच्या सुदृढ मानसिक आरोग्यासाठी MYCA ॲप तयार करण्यात आले असून या ॲपच्या निर्मितीसाठी नोसील लि. (NOCIL Ltd) आणि मोरडे फूडस यांचे अर्थसहाय्य लाभले आहे. कर्मचारी यांच्या सुदृढ आरोग्यासाठी ॲपची मदत होणार असून सर्वांनी ॲप डॉउनलोड करावे व आवश्यक असल्यास डॉक्टरांची मदत घेणे गरजेचे आहे, असे मार्गदर्शन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी उपस्थित सर्वांना केले. यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, जिल्हा कृषी अधिकारी एम.एम. बाचोटीकर, शिक्षक, विद्यार्थी तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रोडिओ जॉकी (आर.जे) संग्राम खोपडे यांनी मानसिक ताण तणावाच्या उत्क्रांती संदर्भांतील माहिती दिली. आजच्या डिजिटल जगातील वाढलेल्या तणावावर बोलताना त्यांनी माणसाच्या एखाद्या समस्येला सामोरे जाण्यासाठी लढा किंवा पळा या प्रतिसादावर भाष्य केले. ज्याप्रमाणे आपण शारिरीक व्याधींवर बोलतो, त्याचप्रमाणे मानसिक आरोग्यावर देखील बोलणे महत्त्वाचे आहे. लोकांमध्ये माहिती प्रसारित करण्यात समाज माध्यमांची व सेलेब्रिटींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. आयुष्यात भावना का महत्वाच्या असतात, भावनांना योग्य पद्धतीने व्यक्त करणे का महत्त्वाचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी आपण स्वतःसाठी व कुटुंबासाठी देखील पुरेसा वेळ देणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी मत व्यक्त केले.

डॉ. हमीद दाभोळकरांनी 'मायका' ॲपच्या निर्मिती मागील पार्श्वभूमी सांगताना 'मानसिक आजार हे योग्य उपचाराने बरे होऊ शकतात' यावर भर दिला. परिवर्तन व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. हमीद दाभोळकर यांनी शासन यंत्रणेचे कौतुक करताना जिल्हा परिषद, ठाणे महाराष्ट्रातील मानसिक आरोग्याबाबत उपक्रम राबविणारी पहिलीच जिल्हा परिषद असल्याचे उद्गार काढले. त्यांनी वयात येणाऱ्या मुलामुलींच्या भावना कशा हाताळाव्या याचे प्रशिक्षण शिक्षकांना, पालकांना उपलब्ध नाही, याकडे लक्ष वेधले. याबद्दल 'मायका' ॲप मध्ये 'भावनिक प्रथमोपचार' या भागात त्याविषयीची शास्रोक्त माहिती उपलब्ध असल्याची माहिती दिली.

वोपा संस्थेचे संचालक प्रफुल्ल शशिकांत यांनी शिक्षण क्षेत्रात ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोचल्यानंतर आता मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करत असताना आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली. "मानसिक आरोग्यासंदर्भात सकारात्मकतेइतकीच स्विकारात्मकता देखील महत्त्वाची असते", असे प्रतिपादन केले. कामध्ये मानसिक आरोग्य, आजारांविषयी, शास्त्रीय माहिती, स्वतःला आणि आपल्या जवळच्या व्यक्तींना भावनिक आधार कसा द्यावा, मानसिक आरोग्याविषयीचे प्रशिक्षण, तज्ञ व्यक्तींशी संपर्क साधण्याची यंत्रणा आदी माहिती मराठी भाषेत उपलब्ध आहे. मायका ॲप द्वारे कर्मचाऱ्यांना त्यांच्या ताण-तणावाचे व्यवस्थापन कसे करावे, भावनिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी कोणती तंत्रे उपयुक्त ठरतील, काम व वैयक्तिक आयुष्य यात संतुलन कसे राखावे, इत्यादीविषयी सविस्तर माहिती उपलब्ध असून या ॲप मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) सहाय्याने चॅटबॉटशी संवाद साधता येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वोपा चे स्वप्नील क्षीरसागर यांनी तर आभार प्रदर्शन ठाणे जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव यांनी केले.

# भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी लिपीचे संवर्धन आवश्यक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई :अक्षरलिपी या सभ्यता व संस्कृतीच्या वाहक असतात. भारतीय संस्कृती प्राचीन असून संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या लिपीचे जतन करणे गरजेचे आहे. अन्यथा आपला इतिहास विसरला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सुलेखनकार अच्युत पालव लिखित 'अक्षरभारती' या कॅलिग्राफी पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते जहांगीर आर्ट गॅलरी येथे झाले. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, नवनीत प्रकाशनाचे संचालक अनिल गाला, पद्मश्री अच्युत पालव उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पद्मश्री श्री.पालव अक्षर कलेला सर्वत्र पोहोचवत असून अनेक लोकांना या कलेमध्ये समाविष्ट करत आहेत. कोणत्याही व्यक्तीला



एखाद्या विषयात चांगले गुण मिळवायचे असतील तर त्यांचे अक्षर चांगले असणे आवश्यक आहे. एक मोठा ज्ञानाचा खजिना देखील या अक्षरांच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचत असतो, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी श्री.पालव यांचे पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

# उमरोली ग्रामपंचायतीला आय.एस.ओ नामांकन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : राज्यात गेल्या काही वर्षांत प्रशासकीय कार्य पद्धतीत बदल होत आहेत. सरकारी कामकाजात पारदर्शकता तसेच वेगाने कामकाज होण्यासाठी ई-गव्हर्नन्स पद्धतीचा वापर केला जात आहे. केंद्र सरकारच्या सूचनांनुसार पंचायत राज संस्थांच्या कारभारात पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागाअंतर्गत आवश्यक असलेले दाखले मिळण्यासाठी ई-पंचायत प्रकल्प राबवण्यात येत आहे. ग्रामपंचायतींच्या कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. ग्रामपंचायतींमधील कागदपत्रांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतीं करण्यासाठी वाटचाली सुरू आहे. त्यामुळे या कार्यपद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामपंचायत उमरोळी ता. जि. पालघर या ग्रामपंचायतीने आपल्या आपल्या कार्यालयातील कामकाज करण्यासाठी अमुलाग्र बदल घडवून आणले. या कामकाजाचे त्रयस्थ संस्थेमार्फत परीक्षण करण्यात आलेले. पात्रता आणि निकष यांच्या अनुषंगाने, ग्रामपंचायत उमरोळीस पालघर जिल्हा परिषद, हुतात्मा सभागृहात श्री.गणेश नाईक- पालघर जिल्हा पालक मंत्री, डॉ. हेमंत सावरा खासदार पालघर जिल्हा, राजेंद्र गावीत - आमदार पालघर विधानसभा, गोविंद बोडके - जिल्हाधिकारी पालघर, भानुदास पालवे- मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. पालघर, यांच्या उपस्थितीत पालकमंत्री यांच्या हस्ते प्रभाकर पांडुरंग पाटील- सरपंच उमरोळी, निलेश देवरे - ग्रामसेवक उमरोळी आणि ग्रामपंचायत सदस्य यांना सन्मान चिन्ह व सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले आहे.

# तलाठ्यांच्या बहिष्काराचा मुरबाडमधील नागरिकांना फटका

## उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी नागरिक त्रस्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड- विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी व नागरिकांना शासकीय कामासाठी अत्यावश्यक असणारा उत्पन्नाचा हवा असतो या दाखल्यांचे प्रकरण महा ई सेवा केंद्र किंवा सेतू केंद्रात सादर करण्यापुर्वी त्यावर स्थानिक महसूल पंचनामा म्हणजे तलाठी पंचनामा महत्वाचा असतो.परंतु तालुक्यातील महसूल विभागाच्या सर्व तलाठ्यांनी हे पंचनामे देण्याचे गेले कित्येक दिवस बंद केले असल्याने शालेय विद्यार्थी व नागरिकांना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती निर्माण झाली आहे तर नागरिकांची शासकीय कामे खोळंबली असल्याने नागरिकां मध्ये प्रचंड नाराजी दिसून येत आहे. याबाबत मुरबाड महसूल विभागाच्या नायब तहसीलदार सुष्मा बांगर यांना विचारणा केली असता विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे नुकसान होत आहे हे खरे आहे. ठाणे जिल्ह्यासह मुरबाड मधील तलाठ्यांच्या संघटनेने दाखले पंचनामे न करण्याचे निर्णय घेतला असून संघटनेने तहसीलदारांना तसे पत्र दिले आहे, त्यासंबंधी लवकरच तोडगा काढला जाईल असे सांगितले. दरम्यान मुरबाड तलाठी संघटनेचे अध्यक्ष यल.के. पवार यांच्याशी संपर्क साधला असता मी 13 तारखे पासुन रजेवर असल्याने यासंबंधी मला माहीती नसून अधिक बोलणे टाळले. शाळेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, निराधार महिलांना, अपंग बांधवांना त्यांच्या हक्का पासून वंचित ठेवणार्या मुजोर तलाठ्यांवर कारवाई करण्याची मागणी समस्त मुरबाडकर करत आहेत.

### पोलीस अधिकारी संदीप गीते यांच्या नेतृत्वाखाली

# मुरबाड पोलीस ठाण्याचा परिसर चकाचक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड- मुरबाड पोलीस ठाण्यात नव्याने आलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप गिते यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रथम मुरबाड पोलीस ठाण्यात स्वच्छता अभियाणाचा कार्यक्रम हाती घेऊन मुरबाड पोलीस ठाण्याचा संपूर्ण परिसर हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप गिते व त्यांच्या सोबत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी साफसफाई करुन पोलीस ठाण्याचा परिसर हा स्वच्छ असावा असे उत्तम उदारहण पोलीस निरीक्षक संदिप गिते यांनी दिले आहे. या मुरबाड पोलिसांनी केलेल्या स्वच्छता अभियानामुळे मुरबाड शहरात सर्वत्र त्यांना शुभेच्छा नागरिक देत आहेत व त्यांचे कौतुक केले जात आहे.





# माजी सैनिकांसाठी 'कॉमन सर्विस सेंटर' स्थापन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : सैनिक कल्याण विभाग-पुणे यांनी केंन्द्रिय सैनिक बोर्ड नवी दिल्ली यांच्या संदर्भिय पत्रान्वये जिल्हा सैनिक बोर्ड या ठिकाणी माजी सैनिकांना स्पर्श पोर्टल (Sparsh Portal) अडचणी येत असल्याने कॉमन सर्विस सेंटरची स्थापन केली आहे. तरी कॉमन सर्विस सेंटरचालवणेसाठी इच्छूक माजी सैनिकांना डिजीआर द्वारे मोफत विशेष प्रशिक्षण देण्यात येईल. तरी रायगड जिल्हयामधील इच्छूक माजी सैनिकांनी CSC केंन्द्र स्थापन करणेसाठी डिजीआर https://dgrindia.gov.in/ या संकेतस्थळावर माजी सैनिकांनी नोंद केली असेल तर आपली नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय रायगड-अलिबाग येथे दोन दिवसात सादर करावेत. असे आवाहन ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग यांनी केले आहे.

# जीवनदीपमध्ये मतदार दिनानिमित्त जन जागृती रॅली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : जीवनदीप महाविद्यालय गोवेली राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत' राष्ट्रीय मतदार दिवसा निमित्त जन जागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. आज 25 जानेवारी 2025 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने मतदार जन जागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदार राजा जागृत असणे महत्वाचे आहे या उद्देशाने या रॅली चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे सर, महाविद्यालयचे प्राचार्य डॉ के.बी. कोरे,प्रशांत घोडविंदे , महविद्यालयाचे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे , सर्व प्राध्यापक तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी दिनेश धनगर सर्व स्वयंमसेवक उपस्थित होते.




# लायन्स क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट इंग्रजी माध्यम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : सफाले आगरवाडी येथील लायन्स क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व लायन्स क्लब ने दिलेल्या ५० बेंचेस व १० सी.सी. टी.व्ही. कॅमेरा ,इन्व्हर्टर बॅटरी, LED टी.व्ही. व १० स्पीकर्स ह्यांचा उद्घाटन सोहळा दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात आला.

त्याच प्रमाणे लायन्स क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट च्या अध्यक्षा निलम सेठीया ह्यांनी गरजू पांच विद्यार्थ्यांचा शिक्षणाची जबाबदारी घेतली व त्यापोटी या वर्षासाठी रुपये ३०,००० चा धनादेश शाळेकडे सुपूर्द केला .त्याचप्रमाणे शाळेची एक माजी विद्यार्थिनी प्रतिक्षा ठाकूर स्वर्गवासी झाली. तिच्या तीन जिवलग मैत्रिणी अस्मिता म्हात्रे, रुपा सावे, सारीका सावे ह्यानी रुपये १,००००० चा धनादेश संस्थेचे अध्यक्ष राजाराम म्हात्रे ह्यांच्या कडे सुपूर्द केला.त्या ठेवीच्या व्याजातून S. S.C. परीक्षेत प्रथम तीन विध्यार्थांना रोख पारितोषिक देण्यात आले. लायन्स क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट च्या अध्यक्षा लायन निलम सेठीया मॅडम, पी.एम.सी.सी. डॉ.ख्वाजा मुदस्सीर P.D.G. लायन परमार , लायन क्लब सफाले चे अध्यक्ष प्रमोद पाटील ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या वेळी लायन्स क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट ने दोन वर्ग खोल्या बांधुन देण्याचे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुण्या युतीका राऊत (ब्रॅण्ड ॲम्बासीडर ऑफ वामन हरी पेठे ज्वेलर्स )यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आपली कोणतीतरी एक आवड जोपासावी. मी स्वतः लग्न झाल्यानंतर जाहिरात क्षेत्रामध्ये माझे करिअर केले, असे आवर्जून सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची नृत्ये व प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका रुपाली भोईर ह्यांनी केले आणि सूत्रसंचालन मनस्वी राऊत व मेघना भोईर ह्यानी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष राजाराम म्हात्रे हे होते. त्यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष चिंतामण ठाकूर, उपाध्यक्षा संगीता गावड, कार्यवाह विश्वनाथ पाटील, विश्वस्त रविंद्र ठाकूर, भरत चौधरी, पर्यवेक्षिका विदुला पाटील व इंग्रजी माध्यम शाळेचे सेक्रेटरी श्री.पी.टी.पाटील तसेच लायन्स क्लब ऑफ सफाळे चे नितीन वर्तक, सचिन वर्तक व त्याचे इतर सहकारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रणय पाटील ह्यांनी केले.




# डोहोळे ग्रामपंचायत 'तालुका सुंदर गांव' पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील डोहोळे ग्रामपंचायतीला महाराष्ट्र शासनाच्या ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागा कडून 'तालुका सुंदर गांव' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

डोहोळे ग्रामपंचायत समिती हि येथील ग्रामस्थांच्या असलेल्या नागरी समस्या व विकासात्मक कामे करुन या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. सन 2022 -23 या वर्षात आर.आर. (आबा) पाटील सुंदर गांव योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये निर्धारित निकषांनी ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायतीने सर्वाधिक गुण तालुका स्तरावर प्राप्त केल्याने या ग्रामपंचायतीला 'तालुका सुंदर गांव' पुरस्कार प्राप्त होऊन ठाणे येथे 26 जानेवारी रोजी या प्रजासत्ताक दिनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते तर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उप मुख्यकार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांच्या उपस्थितीत दहा लाख रुपयांचा धनादेश व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



या पुरस्कार सोहळयावेळी सरपंच सुमन वाघे, उपसरपंच दिनेश ठाकरे, ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य सचिन घोडविंदे, सदस्य ज्ञानेश्वर ठाकरे, शुद्धोदन जाधव, ग्रामस्थ वासुदेव शिंदे, ग्रामपंचायत कर्मचारी आदीजण उपस्थित होते.

# कल्पेश ठाकूरना 'जीवनदूत पुरस्कार'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मुंबई गोवा महामार्गावर कुठेही अपघात झाला तर शासकीय यंत्रणा पोहोचण्यापूर्वी पेणचे देवदूत कल्पेश ठाकूर तेथे पोहोचतात. आपला स्वतःचा व सहकाऱ्यांचा जीव धोक्यात घालून जखमींना बाहेर काढतात. वेळेत रुग्णालयात पोहचवतात. त्यामुळे जखमींना जीवनदान मिळतो. हेच खरे देवदूत आहेत. त्यांचे कौतूक दरवर्षी केलेच पाहिजे. हे लोक निःस्वार्थी पणे काम करत असतात. त्यांना शासनाकडून मदत मिळावी यासाठी मी प्रयत्न करणार, असे आश्वासन राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी साई सहारा प्रतिष्ठान पेणचे संस्थापक कल्पेश शरद ठाकूर, समाजसेवक राजू पिचिका व जिल्ह्यातील अन्य मदतगारांना जीवनदूत पुरस्कार देऊन सन्मानित करताना दिले.

रायगड पोलीस दलातर्फे रस्ता सुरक्षा अभियान 2025 अंतर्गत जीवनदूत सन्मान सोहळा आर.सी. इफ.सभागृह, कुरूळ येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी



## रायगड जिल्हा प्रशासनाकडून सन्मानित

व्यासपीठावर रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवन संरक्षण अधिकारी राहूल पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, तहसीलदार विक्रम पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. जीनवदूत म्हणून काम करणाऱ्या जिल्ह्यातील संस्था व व्यक्तींचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अपघात कमी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मुंबई - गोवा माहामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. या माहामार्गाचे काम पूर्ण झाल्यावर आपघाताचे प्रमाण घटेल. हा महामार्ग पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. मुंबई - गोवा रस्ता पूर्ण होईपर्यंत अपघाताची सर्व जबाबदारी सरकारची आहे असे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले म्हणाले. तर जीवनदूतांचा सत्कार स्तुत्य उपक्रम आहे. जीवनदूत हे खरे देवदूत आहेत. त्यांचा सन्मान केलाच पाहिजे. त्यांच्या कामाची दखल घेतलीच पाहिजे, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.

जीवनदूत हे देवाच्या रूपाने आलेले दुत असतात. अडचणीत असलेल्यांना वाचवण्यासाठी ते येतात. त्यांचा जीव वाचवतात. वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळल्यास अपघात कमी होतील. अपघातग्रस्तांना मतद करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई करायची नाही असे सर्वोच्च न्यायालाने सांगितले आहे. ते लोकांपर्यन्त पाहचेल पाहिजे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले. जनजागृती झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. अपघातात मृत्यूपाणाऱ्यांची संख्या देखील कमी झाली आहे. असे असले तरी अपघात होता. नैसर्गिक आपत्ती येते. त्यावेळी जीवनदूत आपला जीव धोक्यात घालून लोकांचे प्राण वाचवतात. त्यामुळे त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय आम्ही घेतला, असे पोलीस अधिकक्षक सोमनाथ घार्गे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. तर अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# गौरीपाडयात पथदिव्यांचा झगमगाट



## स्फूर्ती फाउंडेशनच्या मागणीला यश

कल्याण : गौरीपाडा परिसरातील नागरीकांच्या तक्रारीनुसार साई सृष्टी सोसायटी व प्रकृति आंगन सोसायटीतील प्रवेशद्वार समोर पथदिवे नसल्याने रात्री अपरात्री प्रवास करताना नागरीक,महिला , जेष्ठ नागरिक यांना समस्यांचा सामना करावा लागत होता, पथदिव्यांसाठी मागील काही वर्षांपासून स्फूर्ती फाउंडेशन माध्यमातून कल्याण डोंबिवली महानगरपालिका विद्युत विभागाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात येत होते होता. निधी अभावी मंजूरी मिळत नव्हती यासाठी स्फूर्ती फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करण्यात आला. त्याला नुकतेच यश आले असून गौरीपाडा परिसरातील साई सृष्टी सोसायटी व प्रकृति आंगन सोसायटीतील पथदिव्यांसाठी पथदिवे (स्ट्रिट लाईट)बसवुन दि.२६ जानेवारी रोजी सुरू करण्यात आले.

यानिमित्ताने कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच विद्युत विभाग व कर्मचारी यांचे आभार स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर व महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी मानले तर या परिसरातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले.

### शहापूर तहसिल विभागात

# राष्ट्रीय मतदार दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तहसिल विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय मतदार जागृती दिवस साजरा करण्यात आला.

25 जानेवारी 2025 हा राष्ट्रीय मतदार जागृती दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिल विभागाच्या तलाठी भवन परिसरात हा राष्ट्रीय मतदार जागृती दिवस कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रम प्रसंगी नायब तहसीलदार वसंत चौधरी, निवडणूक विभागाचे शंकर डामसे, कवी अर्जुन भांबेरे, प्राध्यापक दिगंबर खरात, प्रा.डॉ. राजू शनवार, प्रा. स्वप्निल प्रधान, प्रा. देविदास नवसे व तालुक्यातील महाविद्यालय, उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी, प्राध्यापक व बीएलओ आदीजण उपस्थित होते.



समाजातील सर्व मतदार असलेल्या नागरिकांना लोकशाही मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्यास प्रवृत्त करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचा तहसीलदार कार्यालयामार्फत सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार वसंत चौधरी यांनी मागील झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत या विधानसभा क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढली आहे व त्यामध्ये आपल्या प्रशासकीय विभागा बरोबरच विद्यार्थी, शिक्षक व बीएलओ यांचा सहभाग किती महत्वाचा आहे हे स्पष्ट केले.

तसेच कवी अर्जुन भांबेरे यांनी प्रस्ताविकामध्ये लोकशाहीत मतदाराची भूमिका किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट केले. तर विद्यार्थी व शिक्षकांनी लोकांपर्यंत पोहोचून पथनाट्य, प्रभात फेऱ्या, वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धा व इतर माध्यमांचा वापर करून कशाप्रकारे मतदानासाठी लोकप्रबोधन केले या आशयाच्या अनुषंगाने उपस्थित प्राध्यापक व शिक्षक यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री शंकर डामसे यांनी केले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी